https://myvillagemycitynews.in/
RNI No :- MAHMAR131633/2019

दै. माझं गांव माझं शहर

दिव्यांगाच्या हक्काचं

पुणे,धाराशिव,छ.संभाजीनगर,सोलापूर,मुंबई,अहिल्यानगर इतर सर्व जिल्ह्यातून प्रकाशित होणारे ई-पोर्टल...!

स्थापना वर्षे ५ वे. | मुख्यसंपादक : तानाजी द. घोडके || अंक: ४ पाने || किंमत : ५ रूपये || ई-पेपर उपलब्ध | दिनांक :०१ नोव्हेंबर २०२६



परंडा तालुक्यात शिक्षणाचा बोजवारा: अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना ५ महिने लोटूनही पुस्तके मिळेनात!

पहिले सत्र संपत आले तरी शिक्षण विभागाचे दुर्लक्ष; विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान

परंडा (प्रतिनिधी): परंडा तालुक्यातील शैक्षणिक दुर्दशेचे वास्तव आता चव्हाट्यावर आले आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पाच महिने उलटूनही पाठ्यपुस्तके मिळालेली नसताना, तालुक्यातील इतर ग्रामीण भागांमधील शाळांचीही अशीच बिकट अवस्था असल्याचे समोर येत आहे.

शासनाकडून मोफत पुस्तक वाटपाची योजना दरवर्षी राबवली जात असली, तरी प्रत्यक्षात तालुक्यातील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना अद्याप पुस्तकांचा पूर्ण संच मिळालेला नाही. काही विद्यार्थ्यांना एक-दोन पुस्तके मिळाली असली, तरी बहुतांश विद्यार्थी आजही रिकाम्या हातात शाळेत येत आहेत.विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळइयत्ता पहिली ते चौथी हा विद्यार्थ्यांच्या पायाभरणीचा काळ मानला जातो.

याच वयात मुळाक्षरे, अंकज्ञान आणि वाचनाचा पाया पक्का होतो. मात्र, वर्गात शिक्षक शिकवत असताना विद्यार्थ्यांकडे पुस्तकेच नसल्यामुळे त्यांना धडा समजणे कठीण



झाले आहे. मुलांना नीट लिहिता येत नाही आणि गृहपाठही करता येत नसल्यामुळे त्यांचा अभ्यास पूर्णपणे ठप्प झाला आहे.पालकांसमोर मोठा प्रश्नपहिले सत्र संपत आले आणि परीक्षा तोंडावर आली असताना, मुलांचा अभ्यास कसा घ्यायचा असा गंभीर प्रश्न पालकांसमोर उभा ठाकला आहे.

पालकांनी त्रस्त होऊन खासगी दुकानांमध्ये चौकशी केली असता, तिथेही जिल्हा परिषदेची पुस्तके मिळत नसल्याचे सांगण्यात येते.या प्रकाराकडे शिक्षण विभागाचे गटशिक्षण अधिकारी इंगळे यांचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले असून, याचा फटका गरीब होतकरू ग्रामीण विद्यार्थ्यांना बसत आहे.

त्यामुळे संबंधित प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन तालुक्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना लवकरात लवकर पुस्तके उपलब्ध करून द्यावीत, अशी आर्त हाक संतप्त पालक व नागरिकांमधून दिली जात आहे.

वाटेफळ-इनगोंदा रस्त्याची दुरवस्था; खड्ड्यांमधून जीव मुठीत धरून प्रवास!



परंडा (प्रतिनिधी)परंडा तालुक्यातील वाटेफळ ते इनगोंदा या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या मार्गावरून प्रवास करणे वाहनधारकांसह पादचाऱ्यांसाठी धोकादायक बनले आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून डांबरीकरण उखडल्याने धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

त्यामुळे या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.वाटेफळ-इनगोंदा हा रस्ता केवळ दोन गावांना जोडणारा मार्ग नसून परिसरातील अनेक गावांसाठी जीवनवाहिनी ठरला आहे. आनाळा येथील बँक, आठवडा बाजार व शासकीय वैद्यकीय दवाखाना, तसेच शेळगाव येथील बाजारपेठ आणि शाळांमध्ये जाण्यासाठी नागरिकांना याच रस्त्याचा वापर करावा लागतो. याशिवाय परंडा तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठीही हा महत्त्वाचा मार्ग असल्याने शेतकरी, विद्यार्थी, महिला, नोकरदार आणि रुग्णांची या रस्त्यावर दररोज मोठी वर्दळ असते.

बँकेची कामे, वैद्यकीय उपचार आणि बाजारपेठेसाठी ये-जा करणाऱ्या नागरिकांना खड्ड्यांमधून मार्ग काढताना अक्षरशः जीव मुठीत धरावा लागत आहे. सध्या ऊसतोड हंगाम सुरू असल्याने या मार्गावरून जड वाहनांची वाहतूक वाढली असून रस्त्याची अवस्था आणखी बिकट झाली आहे. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांचा अंदाज येत नाही, तर उन्हाळ्यात उडणाऱ्या धुळीमुळे वाहनचालकांना समोरचे दिसणेही कठीण होते. परिणामी दुचाकी घसरून छोटे-मोठे अपघात घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.या रस्त्याच्या कायमस्वरूपी दुरुस्तीसाठी वाटेफळ, इनगोंदा, आनाळा आणि शेळगाव परिसरातील नागरिकांकडून गेल्या अनेक महिन्यांपासून मागणी केली जात आहे.

मात्र, अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. केवळ तात्पुरती खड्डे बुजविण्याची मलमपट्टी न करता संपूर्ण रस्त्याचे दर्जेदार डांबरीकरण करून कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीला मंजुरी द्यावी आणि प्रत्यक्ष काम सुरू करावे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत.

राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त परंडा शहरात भव्य एकता दौड व सायबर जनजागृती रॅलीचे आयोजन

परंडा (दै.माझं गांव माझं शहर) दि३१ रोजी भारताचे लोहपुरुष, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 151 व्या जयंतीनिमित्त तसेच राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून धाराशिव जिल्हा पोलीस दल व पोलीस ठाणे परंडा यांच्या वतीने आज परंडा शहरात भव्य एकता दौड व सायबर जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाची सुरुवात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा, बंधुभाव व देशाची अखंडता अबाधित राखण्याचा संदेश या दौडीच्या माध्यमातून देण्यात आला. तसेच नागरिकांमध्ये वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करून ऑनलाइन आर्थिक फसवणूक, अनोळखी लिंक, ओटीपी शेअरिंग, बनावट कॉल व सोशल मीडिया फसवणूक यापासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले.सदर एकता दौड रॅलीमध्ये माननीय पोलीस निरीक्षक श्री. आसाराम चोरमले, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. प्रवीण शिरसाट, पोलीस उपनिरीक्षक श्री. बाबासाहेब खरात, तसेच पोलीस ठाणे परंडा येथील पोलीस अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते.याशिवाय कमांडो करिअर अकॅडमीचे संचालक मेजर श्री. महावीर तनपुरे, शिक्षक श्री. नंदकुमार लांबे, अकॅडमीचे विद्यार्थी व विद्यार्थिनी, आर्ट ऑफ लिव्हिंग श्री श्री रविशंकर शाखा परंडा येथील गुरुवर्य श्री. गणेश गायकवाड व सदस्य, होमगार्ड तालुका समादेशक अधिकारी श्री. मनोज परांडकर व होमगार्ड जवान, पत्रकार बांधव तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या 3 कि.मी रॅलीमध्ये सुमारे 450 ते 500 नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पोलीस ठाणे परंडा येथून सुरुवात करून छत्रपती संभाजी महाराज चौक ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथे यशस्वीरित्या विसर्जन करण्यात आले.या उपक्रमातून जात, धर्म, भाषा व प्रांत यापलीकडे जाऊन राष्ट्रीय एकात्मता आणि बंधुभाव जपण्याचा संदेश देण्यात आला. तसेच सायबर गुन्ह्यांपासून स्वत:चे व इतरांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे, सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ 1930 या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा व www.cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या एकता दौड व सायबर जनजागृती रॅलीला परंडा शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस ठाणे परंडा येथील अधिकारी, अंमलदार, होमगार्ड तसेच सहभागी सर्व संस्था व नागरिकांचे सहकार्य लाभले.